
दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
# रायगड नगरी
● वर्ष १६ वे ● अंक १६० ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.३ सप्टेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## बिग बॉस फेम अभिनेता सिद्धार्थ शुक्लाचे निधन

**दै.रायगड नगरी । मुंबई**

बिग बॉस फेम आणि हिंदी मालिकांमधील प्रसिद्ध अभिनेता सिद्धार्थ शुक्लाचं निधन झालं आहे. वयाच्या अवघ्या ४० व्या वर्षी त्यानं जगाचा निरोप घेतला. मिळालेल्या माहितीनुसार, हृदय विकाराच्या तीव्र झटक्यानं त्याचं निधन झालं आहे. परंतु मृत्यूचं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. हृदय विकाराचा झटका आल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जातोय.



बिग बॉसच्या तेराव्या सिझनचा विजेता म्हणून सिद्धार्थ नावारुपाला आला. खतरो के खिलाडी, फिअर फॅक्टर या रिॲलिटी शोमधून सिद्धार्थ झळकला होता. याव्यतिरिक्त बॉलिवूडमध्येही सिद्धार्थ झळकला होता. हम्प्टी शर्मा की दुल्हनिया या चित्रपटात त्यानं सहाय्यक अभिनेत्याची भूमिका साकारली होती. सिद्धार्थच्या निधनामुळं टीव्ही इंडस्ट्री आणि त्याच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. चाहते शोकाकूल आहेत.

# गणेशोत्सवाच्या तोंडावर रत्नागिरीत गावठी बॉम्ब सापडले



**रत्नागिरी : वृत्तसंस्था**

देवरुखजवळ असलेल्या हरपुडे येथे एका व्यक्तीच्या घरात तब्बल १८ जिवंत गावठी बॉम्ब सापडल्याने खळबळ उडाली आहे. पोलिसांनी या प्रकरणी एका ४८ वर्षीय व्यक्तीला अटक केली आहे. सुरेश आत्माराम किर्वे असे या व्यक्तीचे नाव असून काल बुधवारी रात्री उशिरा हे गावठी बॉम्ब सापडले असून या वृत्ताने परिसरात खळबळ उडाली आहे.

हरपुडे येथील सुरेश किर्वे या व्यक्तीच्या घरात गावठी बॉम्ब असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर दहशतवादविरोधी पथक आणि बॉम्ब शोधक व निकामी पथक रवाना झाले. ही कारवाई यशस्वी होण्यासाठी या पथकांनी सापळा लावला. त्यानंतर पथकांबरोबर इतर पोलिसांच्या संयुक्त कारवाई करण्यात आली. पोलिसांनी पाळत ठेवल्यानंतर संधी मिळताच सुरेश किर्वे याच्या घरावर छापा टाकला. या वेळी किर्वे याच्या घरात असलेला स्फोटकांचा साठा बघून पोलिसही चक्रावून गेले.

पोलिसांना या कारवाईत एकूण १८ गावठी बॉम्ब सापडले. विशेष म्हणजे हे बॉम्ब जिवंत होते. या गावठी बॉम्बची किंमत दीड लाखाहून अधिक आहे. या कारवाईत पोलिसांनी सुरेश किर्वे याला ताब्यात घेतले. जिवंत गावठी बॉम्ब बेकायदेशीरपणे आपल्या ताब्यात ठेवणे, त्याद्वारे मानवी जीवितास तसेच प्राण्यांच्या जीवितास धोका निर्माण करणे असे गुन्हे पोलिसांनी देवरुख पोलिस ठाण्यात दाखल केले.

गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेवला असून यादरम्यान रत्नागितीत गावठी बॉम्ब सापडल्याने रत्नागिरीत खळबळ उडाली असून भितीचे वातावरण पसरले आहे. हरपुडे येथील रहिवासी सुरेश किर्वे यांनी हे गावठी बॉम्ब कशासाठी घरात ठेवले याचा तपास पोलिस करत आहेत. गणेशोत्सवात जिल्ह्यात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी आता जिल्हा पोलिस सतर्क झाले आहेत. अशा प्रकारची स्फोटके आणखी कुठे आ-हेत का याचा शोध आता पोलिस घेत असून अनेक संशयित ठिकाणी पोलिसांनी छापा मारण्याचे काम सुरू केले आहे. या प्रकरणाचा अधिक तपास देवरुखचे पोलिस निरीक्षक बाळकृष्ण जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विद्या पाटील करीत आहेत.

## मेट्रोच्या ऑसिलेशन चाचणीची सिडकोच्या उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालकांनी केली पाहणी

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सिडको महामंडळाच्या नवी मुंबई मेट्रो प्रकल्पातील बेलापूर ते पेंधर या मार्ग क्र. १ वर पेंधर स्थानक ते सेंट्रल पार्क स्थानका दरम्यानच्या ५.१४ कि.मी. च्या अंतरावर घेण्यात येत असलेल्या मेट्रोच्या ऑसिलेशन आणि इमर्जन्सी ब्रेक डिस्टन्स चाचण्यांची ०२ सप्टेंबर २०२१ रोजी डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी पाहणी केली व संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना योग्य त्या सूचना दिल्या. सदर मार्गावर रिसर्च डिझाईन न्ड स्टँडर्ड ऑर्गनायझेशन (आरडीएसओ) यांच्याकडून २८ ऑगस्ट २०२१ पासून मेट्रोची ऑसिलेशन चाचणी घेण्यास सुरुवात करण्यात आली असून १४ सप्टेंबर २०२१ पर्यंत ही चाचणी घेण्यात येणार आहे.

या प्रसंगी सिडकोतील के.एम.गोडबोले, मुख्य अभियंता (नवी मुंबई), सिडको, संजय नाडगौडा, अतिरिक्त मुख्य अभियंता (१ आणि मेट्रो), सिडको, नहाणे, कार्यकारी अभियंता, सिडको, कौशल किशोर, सल्लागार, सिडको, सुनिल गुज्रेलवार, सल्लागार, सिडको, नामदेव रबाडे, कार्यकारी संचालक, महा मेट्रो, श्री. अरुण सक्सेना, मुख्य प्रकल्प अभियंता (स्थापत्य), महा मेट्रो, तिवारी यांच्या नेतृत्वाखालील आरडीएसओची टीम यांसह कंत्राटदार जे. कुमार आणि सीआरसीसी हे उपस्थित होते.

नवी मुंबईतील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या आणि नवी मुंबईतील नोड परस्परांना अधिक सुलभरीत्या जोडले जावेत



या उद्देशाने सिडकोतर्फे नवी मुंबई मेट्रो प्रकल्पांतर्गत एकूण ४ उन्नत मार्ग (एलिव्हेटेड कॉरिडॉर) विकसित करण्यात येत आहेत. या मार्गावरील उर्वरित कामे पूर्ण करण्याकरिता सिडकोकडून महा मेट्रोची नियुक्ती करण्यात आली असून मुख्य व्हायडक्ट, आगार प्रवेश व्हायडक्ट, आगार व कार्यशाळा उभारणीची कामे पूर्ण झाली आहेत. तर स्थानकांची उभारणी, लिफ्ट, उद्ववाहन, फर्निचर आणि प्रणाली ही कामे प्रगतीपथावर आहेत.

भारत सरकारच्या रेल्वे मंत्रालयांतर्गत असणाऱ्या आरडीएसओ यांच्यावर देशातील विविध रेल्वे प्रणालींमध्ये प्रमाणीकरण आणि समन्वय साधण्याची जबाबदारी असते. यानुसार आरडीएसओ यांच्याकडून सदर मार्ग क्र. १ वरील पेंधर स्थानक ते सेंट्रल पार्क स्थानका दरम्यानच्या ५.१४ कि.मी. च्या अंतरावर मेट्रोची ऑसिलेशन चाचणी आणि इमर्जन्सी ब्रेक डिस्टन्स चाचणी घेण्यात येत आहे. प्रत्यक्ष प्रवासी वाहतूक सुरु करण्याच्या दृष्टीने चाचपणी म्हणून ऑसिलेशन चाचणी अत्यंत महत्त्वाची ठरते. ऑसिलेशन चाचणी पार पडल्यानंतर लवकरच मार्ग क्र. १ वर प्रवासी वाहतूक सुरू करण्यात येणार आहे.

मेट्रोची ऑसिलेशन चाचणी हा नवी मुंबई मेट्रो प्रकल्पातील प्रत्यक्ष प्रवासी वाहतूक सुरू करण्यापूर्वीचा महत्त्वाचा टप्पा आहे. यामुळे लवकरच या मार्गावर प्रत्यक्ष प्रवासी वाहतूक सुरू करणे शक्य होणार असून, मेट्रोच्या रूपाने नवी मुंबईकरांना जलद, सुखकारक आणि पर्यावरणपूरक प्रवासाचा सक्षम पर्याय उपलब्ध होणार आहे.

**डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

## जेएनपीटीची कंटेनर टर्मिनलचे खासगीकरणा आधीच स्वेच्छानिवृत्ती योजना

### कामगार संघटना आणि कामगारांमध्ये संभ्रमाचे वातावरण

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीटीच्या मालकीचे एकमेव उरलेल्या कंटेनर टर्मिनलचे खासगीकरण करण्यासाठी जागतिक स्तरावर निविदा काढण्यात आल्यानंतर आता बंदरात उरलेल्या सुमारे १ हजार ३१५ कामगारांसाठी १ सप्टेंबरपासून कर्मचाऱ्यांसाठी विशेष स्वेच्छानिवृत्ती योजना (एसव्हीआरएस) जाहीर केली आहे. जेएनपीटीने जाहीर केलेल्या या योजनेला केंद्र सरकारच्या बंदर, नौकानयन मंत्रालयानेही मंजुरी दिली असून विविध स्तरांवरील चर्चेनंतर सहा महिने मुदतीच्या एसव्हीआरएस योजनेला येथील कामगार संघटनांनी विरोध दर्शविला आहे.तर कोणत्याही कामगारांनीही एसव्हीआरएस घेऊ नये असे आवाहन कामगार संघटनांनी केले आहे.



जेएनपीटी बंदरात सध्या १ हजार ३१५ कामगार काम करीत आहेत.त्यापैकी ९०० कामगार कंटेनर टर्मिनलमध्ये काम करत आहेत.जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टने एकमेव उरलेल्या मालकीच्या याच कंटेनर टर्मिनलचेही खाजगीकरण करण्यासाठी २३ ऑगस्ट २०२१रोजी जागतिक निविदा जारी केल्या आहेत. कंटेनर टर्मिनलच्या खासगीकरणासाठी काढण्यात आलेल्या निविदेमध्ये यशस्वी होणाऱ्या खासगी निविदाधारकावर जेएनपीटी टर्मिनलमध्ये काम करणाऱ्या सुमारे ९०० कामगारांना कामावर सामावून घेण्यासाठी निविदाधारकाच्या हिताला बाधा येईल, असे जेएनपीटीकडून कोणत्याही प्रकारचे बंधन घालणार नसल्याचे सांगण्यात येत आहे.यामुळे जेएनपीटी टर्मिनलमध्ये काम करणाऱ्या सुमारे ९०० कामगारांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

मग अशा अतिरिक्त ठरु पाहाणाऱ्या ९०० कामगारांचे करायचे काय ? असा कठीण प्रश्न जेएनपीटी समोर उभा राहिला होता.या ९०० कामगारांमध्ये अनेक कामगार ३० वर्षं सर्व्हिस झालेले असुन बहुतेक ५२ ते ५५ वयोगटातील आहेत.म्हणजेच सेवानिवृत्त होण्यासाठी आणखी ५ ते ८ वर्षांचा कालावधी उरला आहे.तर अनेक कामगार ४० ते ४५ वयोगटातील असुन, अशा कामगारांची सर्व्हिस फक्त १० वर्ष .../२

## संक्षिप्त...

### वसईतील भुईगाव समुद्रात संशयित बोट आढळली

**दै.रायगड नगरी । मुंबई**

वसईच्या भुईगाव समुद्रात एका ठिकाणी खडकात स्थिर बोट आढळल्याने या बोटीबद्दल संशय निर्माण झाला असून याबाबत तटरक्षक दलाला पोलिसांनी कळविण्यात आले आहे. या समुद्र किनारी वसई पोलिसांनी धाव घेतली आहे.

भुईगावच्या समुद्र किनारी खडकाळात एक संशयित अडकलेली बोट स्थानिकांना गुरुवारी संध्याकाळच्या सुमारास सापडल्यावर वसई पोलिसांना माहिती देण्यात आली. वसईचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कल्याणराव कर्पे यांनी अधिकारी व फौजफाटा घेऊन घटनास्थळी धाव घेऊन बंदोबस्त लावला आहे. समुद्रात आतमध्ये बोट असून मध्यम स्वरूपाची असून याला एक कॅबिन असल्याची माहिती कर्पे यांनी दिली. तर भुईगाव बीच परिसरात बोट सापडली आहे. तटरक्षक दलाला याबाबत माहिती दिली असून त्यांनी हवाई निगराणीद्वारे तपासणी केली आहे. बोटीवर पोहोचणे कठीण असून तरीही बोट किंवा मालकाची ओळख झालेली नाही असे परिमंडळ दोनचे पोलीस उपायुक्त संजयकुमार पाटील यांनी लोकमतला सांगितले. बोट भरसमुद्रात आहे, हेलिकॉप्टरची एक फेरी जाऊन आली आहे, नौदल, मेरी टाईम बोर्ड, कस्टम अधिकारी, कोस्ट गार्ड आणि वसई पोलीस तपास करीत आहेत.

## महेंद्र घरत यांचा अलिबागला रविवारी पदग्रहण सोहळा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांचा पदग्रहण सोहळा व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या कार्यकारणीत समाविष्ट करण्यात आलेल्या रायगड जिल्ह्यातील ॲड. प्रवीण ठाकूर व स्नेहल जगताप यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे.



तसेच विस्तारित कार्यकारणीची बैठक संपन्न होणार आहे. यावेळी तालुका, जिल्हा व राज्यातून अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. कोविड १९ चे नियम पाळून व सामाजिक अंतराचे भान ठेऊन सदर पदग्रहण सोहळा यशस्वीपणे पार पाडण्याची जबाबदारी आपल्या प्रत्येक कार्यकर्ता व पदाधिकारी यांची राहील.

सदर कार्यक्रम रविवार दि. ५ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता काँग्रेस भवन अलिबाग येथे संपन्न होणार आहे. तरी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजन समिती प्रमुख अभिजित पाटील यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे.

### रविवारी कर्नाळा पक्षी अभयारण्यात...

## वन्यजीव संरक्षण उपाय योजनांच्या अंमलबाजाणीसाठी मानवी साखळी




**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील कर्नाळा पक्षी अभयारण्यामध्ये पक्षी- प्राणी सुरक्षित नसल्याची बाब वारंवार समोर येत आहे. अभयारण्यातील पक्षी-प्राण्यांच्या सुरक्षेसाठी लाखो रुपये खर्च करून महामार्गावर प्राणी येणार नाही यासाठी केलेल्या प्रतींबधात्मक उपाययोजना तांत्रिकदृष्ट्या फोल ठरल्या असल्याचे दिसत आहे.

अभयारण्याच्या शेजारीच असलेल्या मुंबई गोवा महामार्गावर बेशिस्त प्रवाशी आणि पर्यटक आपल्या स्वानंदासाठी महामार्गावरच मानवी खाद्यपदार्थ पक्षी-प्राण्यांना टाकतात जे प्राण्यांसाठी योग्य नाही हे खाद्यपदार्थ खाण्यासाठी माकडं व काही पक्षी महामार्गावर येतात आणि अपघातात अशा पक्षी-प्राण्यांचा जीव जात आहे. खरंतर अशा अनभिज्ञ नागरीकांमध्ये जनजागृती करणे तसेच बेशिस्त प्रवाशी व पर्यटकांवर महाराष्ट्र वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ अंतर्गत कारवाई करणे हे वन विभागाचे कर्तव्य असतानाही याबाबत कर्नाळा अभयारण्यातील वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना अनेक वेळा सांगूनही कारवाई होत नाही याचा निषेध नोंदवून कोकण कट्टा विलेपार्ले आणि ग्राम संवर्धन सामाजिक संस्था , बांधनवाडी (पनवेल) या स्वयंसेवी संस्थांच्या वतीने कोरोना प्रतिबंधात्मक नियमांचे पालन करून रविवारी ५ जुलै रोजी .../२

## लोहारे येथे जवान धीरज शाम साळुंखे यांच्यावर अग्निसंस्कार

### कुडपणचे जवान सचिन चिकणे यांनाही समाजाकडून श्रध्दांजली



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

बुधवार दि. १ सप्टेंबर २०२१ हा दिवस पोलादपूर तालुक्यातील देशप्रेमी जनतेच्या मनावर आघात करणारा ठरला. लोहारे येथील धीरज शाम साळुंखे या जवानाचा दिल्ली येथे लष्करी इस्पितळात तर सचिन चिकणे या जवानाचा रूग्णालयामध्ये उपचारादरम्यान मृत्यू झाला. यापैकी धीरज याचे आप्तपरिवार पोलादपूर तालुक्यात असल्याने गुरूवारी सकाळी सामाजिक स्तरावर अंत्यसंस्कार करण्यात आले. दोन्ही जवानांना समाजातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

धीरज साळुंखे याने २०१४ मध्ये भारतीय सैन्यात कोणत्याही मार्गदर्शनाशिवाय स्वबळावर भरती होण्यात यश मिळाले. एएसइ डिपार्टमेंटमध्ये सात वर्षे नोकरी करीत असताना २०१७ मध्ये लग्न होऊन १ मुलगाही झाला. गेल्या दीड वर्षापूर्वी त्याला ब्लड कॅन्सर असल्याचे निदान झाल्याने त्याच्यावर दिल्लीतील लष्करी इस्पितळामध्ये उपचार सुरु झाले. दोनच महिन्यांपूर्वी धीरज यांने ब्लड कॅन्सरवर मात करून पुन्हा डिपार्टमेंटमध्ये रूजू होऊन लष्करी सेवेला सुरूवात केली. गेल्या चार पाच दिवसांपासून धीरज याला अस्वस्थ वाटू लागल्याने पुन्हा दिल्लीतील लष्करी इस्पितळामध्ये दाखल झाल्यानंतर आजार .../२

## सुधागड मनसेचे पाली वीज महावितरण कार्यालयात घंटानाद आंदोलन

### सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी

**दै.रायगड नगरी । सुधागड/पली**

सुधागड मनसेतर्फे गुरुवारी (ता.२) पाली महावितरण कार्यालयात घंटानाद आंदोलन करण्यात आले. यावेळी सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी देण्यात आली.

वारंवार खंडीत होणारी वीज व गणरायाचे आगमन काही दिवसांवर आले आहे तरी देखील तालुक्यातील पथदिवे चालू करण्यात आले नाहीत. याकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आणि प्रशासनाला जागे करण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले होते. यावेळी उपकार्यकारी अभियंता जतीन पाटील यांनी सांगितले की ग्रामपंचायतींचे एप्रिल आधीचे पथदिव्यांची सर्व देयके शासनाने माफ केली आहेत. एप्रिल पासून ऑगस्ट पर्यंतची चालू देयके सव्याज भरल्यास .../२



राष्ट्रवादीचे नेते एकनाथ खडसे (मा.महसुल मंत्री) यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना रहेमान शेख, जहुर शेख (मुक्ताईनगर) रफीक शेख.

# प्रवर्तक विकासकांना अतिरिक्त अधिमूल्यावर रिव्हर्स चार्ज मेकॅनिझमचा लाभ देण्याचा सिडकोचा निर्णय

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

भूखंडाकरिता अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक (एफएसआय) मंजूर करून घेण्याकरिता भराव्या लागणाऱ्या अतिरिक्त अधिमूल्यावर प्रवर्तकांना (प्रमोटर्स) रिव्हर्स चार्ज मेकॅनिझनमचा लाभ घेता येईल असा निर्णय सिडको महामंडळाकडून घेण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासनाचे एकात्मिक विकास आणि प्रोत्साहन नियमावली २०20 (युडीपीसीआर २०20) धोरण संपूर्ण नवी मुंबईसह सिडको अधिकारक्षेत्राला लागू होत असल्याने या धोरणांतर्गत भाडेपट्टाधारकाकडून अतिरिक्त अधिमूल्य आकारून, भूखंडाकरिता अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करण्याची तरतूद आहे. यानुसार सिडकोकडून नवी मुंबईमध्ये वाटपित करण्यात आलेल्या भूखंडांकरिता अनुज्ञेय अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करण्याकरिता जीएसटीसह अतिरिक्त अधिमूल्य आकारण्यात येते.

परंतु काही प्रवर्तक अर्जदारांनी अतिरिक्त अधिमूल्यावर जीएसटी आकारण्यात येऊ नये, याबाबतची विनंती सिडकोला केली होती. या संदर्भात सिडकोकडून जीएसटी तज्ज्ञ सल्लागारांबरोबर विचारविनिमय करण्यात आला. सदर तज्ज्ञांनी केलेल्या सूचनेन-ुसार, संबंधित भूखंडावर निवासी बांधकाम प्रकल्प किंवा कोणताही बांधकाम प्रकल्प विकसित करून त्याची खरेदीदारांना विक्री करू इच्छिणाऱ्या प्रवर्तकाकडून अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकावर आकारण्यात येणाऱ्या अतिरिक्त अधिमूल्यावर सिडकोला जीएसटी आकारण्याची व संकलित केलेला जीएसटी कर यंत्रणांना अदा करण्याची आवश्यकता नाही. या ऐवजी अधिसूचना क्र. ०४/२०१९ आणि ०५/२०१९ सीजीएसटी रेट नुसार, संबंधित प्रवर्तक हे रिव्हर्स चार्ज मेकॅनिझम अंतर्गत कर भरू शकतात, अशी सूचना तज्ज्ञ सल्लागारांकडून करण्यात आली.

रिव्हर्स चार्ज मेकॅनिझम अंतर्गत लाभ घेऊ इच्छिणाऱ्या प्रवर्तक अर्जदारांनी काही बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे. अर्जदारांकडून आपण उपरोक्त जीएसटी कायद्यातील तरतुदींनुसार रिव्हर्स चार्ज मेकॅनिझमचा लाभ घेण्यास पात्र असल्याची पुष्टी देणारी विनंती करण्यात यावी. अर्जदारांकडून रेरा अधिनियम २०१६ नुसार आपण प्रवर्तक असल्याची पुष्टी करण्यात यावी. अर्जदारांनी ५०० रुपयांच्या न्यायिकेतर स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र तथा वचनपत्र सादर करून, अधिसूचना क्र. ०४/२०१९ आणि ०५/२०१९ सीजीएसटी रेट नुसार रिव्हर्स चार्ज मेकॅनिझन अंतर्गत आपण आपले जीएसटी दायित्व निभावणार असल्याबाबत पुष्टी द्यावी.

तरी लवकरात लवकर उपरोक्त आवश्यक बाबींची पूर्तता करून अधिकाधिक प्रवर्तकांनी रिव्हर्स चार्ज मेकॅनिझम अंतर्गत देण्यात येणाऱ्या जीएसटी सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सिडकोकडून करण्यात आले आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, श्री अतुल अनंत पाटणकर, रा.लोकमान्य टिळक रोड, पनवेल, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०६ प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भूखंडाचे वाटप झालेले आहे. सदर भूखंड हे वर उल्लेख केलेले शेतकरी यांच्या संपादीत जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के गावठाण विस्तार योजनेंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबई कडून खालीलप्रमाणे पात्रता मंजूर होवून करारनामा झाला आहे. वर नमूद शेतकऱ्यांकडून खालील वर्णन केलेला भूखंड माझे अशिल नरेश सुरेश पाटील पत्ता : सेक्टर १९, मु.मुर्बी गाव, पोस्ट खारघर, तालुका : पनवेल यांनी त्रिपक्षीय करारनामा / हस्तांतरण करण्याचे व विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**
**सिडको फाईल क्रमांक ५८६ खारघर नोड**

| नोड | सेक्टर | प्लॉट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| खारघर | १९ | १९९ | ४० चौ.मी. |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड.सुजाता जो.पाटील**
**विसावा को.ऑप.हौ.सोसायटी, प्लॉट नं.ई १२४/१३, सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई-४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, १ ) रामचंद्र गौऱ्या भोईर रा.घर नं.७१९, ओवे गाव, सेक्टर ३० खारघर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भूखंडाचे वाटप झालेले आहे. सदर भूखंड हे वर उल्लेख केलेले शेतकरी यांच्या संपादीत जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के गावठाण विस्तार योजनेंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबई कडून खालीलप्रमाणे पात्रता मंजूर होवून करारनामा झाला आहे. वर नमूद शेतकऱ्याकडून खालील वर्णन केलेला भूखंड माझे अशिल सलीउमुद्दीन मोहीउद्दीन शेख, पत्ता : हिल नं.२, नारायण नगर, घाटकोपर पश्चिम ४०००८६ यांनी त्रिपक्षीय करारनामा/हस्तांतरण करण्याचे व विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**
**सिडको फाईल क्रमांक २६३ खारघर नोड**

| नोड | सेक्टर | प्लॉट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| खारघर | ३५ ई | ४४ बी | १४६.३७ चौ.मी. |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड.सुजाता जो.पाटील**
**विसावा को.ऑप.हौ.सोसायटी, प्लॉट नं.ई १२४/१३, सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई-४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**


पृष्ठ क्र.१ वरुन...

## जेएनपीटीची कंटेनर टर्मिनलचे खासगीकरणा आधीच स्वेच्छानिवृत्ती योजना

सर्व्हिस झालेली आहे. अशा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष काम करणाऱ्या कामगारांसाठी जेएनपीटीने विशेष स्वेच्छानिवृत्ती योजना (एसव्ह-ीआरएस) जाहीर केली आहे. जेएनपीटीने जाहीर केलेल्या या योजनेला केंद्र सरकारच्या बंदर, नौकानयन मंत्रालयाचे सचिव राजीव नायर यांनी अध्यादेश जारी करून मंजुरी दिली आहे. केंद्रीय नौकानयन मंत्रालयाच्या मान्यता दिलेल्या विशेष स्वेच्छानिवृत्ती योजनेनुसार स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या कामगारांच्या वारसांना नोकरीचा हक्क राहाणार नाही.१० वर्षं सर्व्हिस वयाची ४० झालेले आणि ३० वर्षं सर्व्हिस झालेल्या कामगारांना स्वेच्छानिवृत्ती दिली जाणार आहे.३० वर्षं सर्व्हिस आणि वयाची ५२ ते ५५ वयोगटातील स्वेच्छानिवृत्ती घेणाऱ्या कामगारांना ६० महिन्याचा पगार दिला जाणार आहे.स्वेच्छानिवृत्ती न घेणाऱ्या कामगारांना खासगी यशस्वी निविदाधारकांनी सामावून न घेतल्यास अशा कामगारांना जेएनपीटी वगळता अन्य बंदरात काम करावे लागेल आदी अटी - शर्ती घालण्यात आल्या आहेत. जेएनपीटीने जाहीर केलेल्या या स्वेच्छानिवृत्ती योजनेबाबत कामगार आणि कामगार संघटनांमध्ये एकमत नाही.त्यामुळे काही कामगार तर काही कामगार संघटनांचा या स्वेच्छानिवृत्ती योजनेला विरोध केला आहे.स्वेच्छानिवृत्ती योजनेला विरोध दर्शवित कोणत्याही परिस्थितीत कामगारांनी स्वेच्छानिवृत्ती स्विकारु नये असे आवाहन केले असल्याची माहिती विद्यमान जेएनपीटी कामगार विश्वस्त तथा जेएनपीटी एकता कामगार संघटनेचे अध्यक्ष दिनेश पाटील यांनी सांगितले.

याबाबत जेएनपीटी अध्यक्ष संजय सेठी यांच्याशी पुढील आठवड्यात चर्चा करण्यासाठी बैठक बोलावण्यात येणार असल्याचेही दिनेश पाटील यांनी सांगितले.काही कामगारांच्या हिताची तर काही कामगारांच्या भविष्याला बाधक ठरू पाहणारी जेएनपीटीची स्वेच्छानिवृत्ती योजना आहे. कामगारांच्या भवितव्याचा विचार करून कामगारांच्या हिताला कोणत्याही प्रकारची बाधा येणार नाही, यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती जेएनपीटी वर्कर्स युनियनचे सरचिटणीस रविंद्र पाटील यांनी दिली आहे.

## वन्यजीव संरक्षण उपाय योजनांच्या अंमलबाजाणीसाठी मानवी साखळी

कर्नाळा पक्षी अभयारण्य हद्दीतील महामार्गाच्या कडेला वन्यजीव संरक्षणाच्या जनजागृती व उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी मानवी साखळी तयार करण्यात येणार आहे. दरम्यान कोकण कट्टा संस्थापक अजित पितळे,सचिव सुजित कदम आणि ग्राम संवर्धनचे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांनी या मानवी साखळीत परिसरातील प्राणीमित्र व निसर्गप्रेमींनी सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. त्याचप्रमाणे वन विभागाने करावयाच्या अपेक्षित उपाययोजनांमध्ये कर्नाळा पक्षी अभयारण्यामध्ये पशु-पक्षी आणि प्राण्यांवर वैद्यकीय उपचार सुविधा व त्यासाठी लागणा-या वैद्यकीय साहित्याची तात्काळ व्यवस्था करण्यात यावी, कर्नाळा पक्षी अभयारण्यात येणाऱ्या सर्व पर्यटक व प्रवाशांना वन्यजीव संरक्षण कायद्याबाबत माहिती मिळणे संबंधित बॅनर्स लावण्यात यावेत व माहिती पत्रके देण्यात यावीत, सध्या लावण्यात आलेल्या साऊंड ब्रेकर वौलच्या वरच्या (Top Surface) भागास निमुळते करण्यात यावे किंवा काटेरी तार लावण्यात यावी जेणेकरून त्यावर माकडे बसू शकणार नाहीत ज्यामुळे माकडे महामार्गावर येणार नाहीत, माकडांना एका बाजूने दुसऱ्या बाजूकडे जाण्यासाठी सध्या एकच मंकी लेडर बांधण्यात आले आहे त्यांची संख्या वाढविण्यात यावी, कर्नाळा अभयारण्य हद्दीतील महामार्गावर गतिरोधक (रंबलर स्ट्रिप्स) मारण्यात याव्यात जेणेकरून वाहनांचा वेग कमी होऊन अपघात कमी होतील, अभयारण्य क्षेत्रातील महामार्गावर खाद्यपदार्थ टाकणाऱ्या बेशिस्त प्रवाशी, पर्यटकांवर नजर ठेवण्यासाठी सी.सी.टी.व्ही कॅमेरे लावण्यात यावे आणि वन कर्मचाऱ्यांमार्फत महामार्गावर गस्त घालण्यात यावी.

## लोहारे येथे जवान धीरज शाम साळुंखे यांच्यावर अग्निसंस्कार

बळावल्याने बुधवारी पहाटे त्याची प्राणज्योत मालवली. दिल्ली येथील लष्करीतळामध्ये जवान धीरज साळुंखे आणि जवान सचिन चिकणे यांना लष्करी इतमामात सलामी देण्यात आल्यानंतर धीरज याचे पार्थिव मुंबईला रवाना झाले. मुंबईमध्येही जवान धीरज साळुंखे यांना सलामी देण्यात येऊन पार्थिव नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. जवान सचिन चिकणे याचे पार्थिव पुणे येथे नातेवाईकांकडे रवाना करण्यात येऊन तेथे अग्निसंस्कार करण्यात आल्याची माहिती यावेळी प्राप्त झाली. पोलादपूर येथे जवान धीरज यांच्या पार्थिवाची अंत्ययात्रा सजवलेल्या ट्रकवरून 'जबतक सूरज चाँद रहेगा। धीरज तेरा नाम रहेगा।'अशा घोषणांनी आसमंत दुमदुमत काढण्यात आली. पोलादपूरच्या तहसिलदार दिप्ती देसाई, निवासी नायब तहसिलदार समीर देसाई, एपीआय प्रशांत जाधव यांनी शासनातर्फे पुष्पचक्र अर्पण करून श्रध्दांजली वाहिली. यावेळी समाजातर्फे माजी उपसभापती संभाजी साळुंखे, रघुनाथ वाडकर, नामदेव उतेकर, राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयातील प्रतिनिधी जाधव आदींनी जवान धीरज यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. याप्रसंगी उपस्थितांनी जवान सचिन गणेश चिकणे यांनाही श्रध्दांजली अर्पण केली. बुधवारी धीरजच्या मृत्यूची बातमी पोलादपूरकरांना शोकाकूल करीत असताना दुपारी कुडपण येथील जवान सचिन चिकणे याच्या उपचारादरम्यान झालेल्या मृत्यूची बातमी धडकली आणि संपूर्ण पोलादपूर तालुक्यातील देशप्रेमी जनतेवर दु:खाचे सावट पसरले.

## सुधागड मनसेचे पाली वीज महावितरण कार्यालयात घंटानाद आंदोलन

वीज पुरवठा चालू केला जाईल. तसेच ही देयके भरण्याचे हमीपत्र गटविकास अधिकाऱ्यांनी आम्हाला दिल्यास वरिष्ठांकडे पाठवून त्यांच्या आदेशानुसार पथदिवे चालू करण्यासंदर्भात निर्णय घेतला जाईल. असे देखील पाटील यांनी सांगितले. यावेळी पोलीस निरीक्षक विजय तायडे व पोलिसांनी आंदोलनकर्त्यांना पोलीस स्थानकात नेले. यावेळी सुधागड तालुका मनसे अध्यक्ष सुनील साठे, विभाग अध्यक्ष केवल चव्हाण, पाली शहर अध्यक्ष अंकुश चोरघे, परेश वनगले, शेखर चव्हाण, अजिंक्य पाशीलकर, शेखर पांगारे, बाबू लोंढे, प्रणय सुतार, मदन पांगारे व अनाजी शिंदे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.


मा.भाकरे सो.कोर्ट
ॲड.रुपाली पाटील

## जाहीर नोटीस

मा.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, पनवेल यांचे कोर्टात, पनवेल
चौ.अर्ज क्र.९४०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०६/१०/२०२१

१) श्री.महेंद्रकुमार प्रभुदास वोरा
वय : ८७ वर्षे, व्यवसाय : शेती
रा.१०२, झोजवाला कॉम्प्लेक्स,
आग्रा रोड, कल्याण वेस्ट, ठाणे-४२१३०१
२) श्री.किशोरकुमार प्रभुदास वोरा
वय : ७५ वर्षे, व्यवसाय : शेती
रा.११०२, अनंत रिजेंसी, फेज-३,
मकबरा रोड, काळा तलाव, ठाणे-४२१३०१ ... अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही ... सामनेवाले

वरील अर्जदार १ व २ यांचे भाऊ मयत कै.श्री.बळवंतराय प्रभुदास वोरा, रा.११०२, अनंत रिजेंसी, फेज-३, मकबरा रोड, काळा तलाव, ठाणे-४२१३०१ यांचे दि.२६/०७/२०२० रोजी ११०२, अनंत रिजेंसी, फेज-३, मकबरा रोड, काळा तलाव, कल्याण वेस्ट, ठाणे-४२१३०१ येथे निधन झाले. अर्जदार त्यांचे भाऊ असून सदर मयताच्या नावे असलेली मिळकत खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : भाताण, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | ६२ | १/ब | ४५-७३-२० पो.ख. २६-७६-०० | ६४.१७ |

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदाराने वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताच्या मिळकतीचा वारस म्हणून दाखला देण्यात येईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२७/०८/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**
कोर्टाचा शिक्का
**सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

राव साहेब
वकील श्री.मितुल चं. लव्हेकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील सह दिवाणी न्यायालय व.स्तर
मा.एम.एम.राव सो.पनवेल यांचे कोर्टात
स्पे.मु.क्र.१७/२०२१
नि.नं.१८/ड
ने.ता.०८/१०/२०२१

मे.एम.के.एन्टंरप्रायझेस तर्फे
श्री.कांतीलाल हंसराज भानुशाली ... वादी
विरुद्ध
श्रीमती.मंदा प्रल्हाद झुगे आणि इतर ... प्रतिवादी
प्रती,
श्रीमती.मंदा प्रल्हाद झुगे
श्रीमती.ज्योती जगन्नाथ गडकरी
श्रीमती.शोभा चंद्रकांत पाटील
श्रीमती.बेबी तुळशीराम म्हात्रे
रा.कोपर (कोल्ही), तालुका : पनवेल,
जिल्हा : रायगड-४१०२०६

वरील अर्जदार श्री.कांतीलाल हंसराज भानुशाली ह्यांनी सदरचा स्पेशल मुकदमा पनवेल येथील दिवाणी न्यायालय व.स्त.यांचे कोर्टात वर नमूद प्रतिवादी श्रीमती.मंदा प्रल्हाद झुगे आणि इतर यांच्या विरुद्ध दाखल केलेला आहे. सदरच्या स्पेशल मुकदमामध्ये नमूद श्रीमती.मंदा प्रल्हाद झुगे, श्रीमती. ज्योती जगन्नाथ गडकरी, श्रीमती.शोभा चंद्रकांत पाटील, श्रीमती.बेबी तुळ-शीराम म्हात्रे यांचा प्रतिवादी क्र.१ ते ४ बनविण्यात आले आहे. आपल्याला पारंपारिक पद्धतीने नोटीसीची बजावणी करता येत नसल्यामुळे वैकल्पिक सर्व्हीसचा वापर करत आहोत.

सदरचा स्पेशल मुकदमा वादीने तुमच्या आणि अन्य इसमांच्या विरुद्ध दाखल केलेला आहे. तसेच आपल्याला सदरचे नोटीस बजाविण्यात येत आहे. तरी आपण स्वतः किंवा वकीलामार्फत आपली बाजू मांडण्याकरिता दि.८/१०/२०२१ रोजी सकाळी १० वा. ३० मि. न्यायालयात हजर रहावे. तसेच आपण आपल्या म्हणणे मे.न्यायालयात सर्व कागदपत्रांसहीत दाखल करावे.

तसेच सदरच्या नोटीसीची आपण गांभीर्याने दखल घेवून मे.न्यायालयात आपले म्हणणे सर्व कागदपत्रांसहीत दाखल करावे. जर आपण मे.न्यायालयात सर्व कागदपत्रांसहीत हजर राहण्यास असमर्थ राहिल्यास आपल्या विरुद्ध सदरचा स्पेशल मुकदमा एक तर्फी चालविण्याचा आदेश पारित होईल याची आपण नोंद घ्यावी.

आज दि.२/९/२०२१ रोजी माझ्या सही आणि शिक्क्यासहीत देण्यात येत आहे.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**
कोर्टाचा शिक्का
**सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

## जाहीर नोटीस

माझे पक्षकार मारुती गोमा भगत व इतर यांनी मला अधिवक्ता (वकील) अधिकृत केले आहे व दाखविलेल्या कागदपत्रावरुन रायगड भागातील तमाम लोकांस कळविण्यात येते की, माझे पक्षकारांची मौजे : कोप्रोली, तलाठी समाज नेरे, ता.पनवेल येथील सर्वे नं.१/१, ९८, १/४, ३, ५/१०, १६/६ मधील खुली शेतजमीन मिळकत वडिलोपार्जित असून सदर मिळकती बाबत कोणत्याही प्रकारचा व्यवहार, खरेदी, गहाण, दान, बक्षिस, हस्तांतरण, विकसन किंवा कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये. कारण सदर मिळकत माझ्या पक्षकाराच्या वडिलोपार्जित मिळकतीचा अविभाज्य हिस्सा असून, सदर मिळकतीचे हस्तांतरण तारण, गहाण, खरेदी-विक्री करण्यास आमची परवानगी नाही.

तरी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर मिळकती बाबत उपरोक्त उलेखलेल्या कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये. अशा प्रकारचा व्यवहार केल्यास त्याच्या कायदेशीर कारवाई व नुकसानीसाठी ते स्वतः जबाबदार असतील व त्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**सही/-**
**अशिल तर्फे अधिवक्ता**
**ॲडव्होकेट अविनाश गायकवाड**
**मो.नं.९७६९११६३२२**

मा.मुजावर साहेब कोर्ट
ॲड.सुनील एन. मोरे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर/क.स्तर) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.११३७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०६/१०/२०२१

१) श्री.संदीप यशवंत वाघ
वय : ४५ वर्षे, व्यवसाय : धंदा
रा.के.एल-४, रुम नं.४, बिल्डींग नं.४५,
सेक्टर ४ ई, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड
२) सौ.सुजाता अनिल दुर्गाडे
लग्ना अगोदरचे नाव : कुमारी सुजाता यशवंत वाघ
वय : ४२ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.के.एल-४, रुम नं.४, बिल्डींग नं.४५,
सेक्टर ४ ई, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड ... अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही ... सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ व २ यांचे वडील कै.यशवंत भाऊ वाघ यांच्या नावाने सिडकोकडे नोंदीत आहेत. अर्जदार नं.१ व २ यांचे वडील कै.यशवंत भाऊ वाघ हे दि.०८/०८/१९९६ रोजी मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार नं.१ व २ यांची आई कै.सिताबाई यशवंत वाघ या दि.१५/०९/२०२० रोजी के.एल-४, बिल्डींग नं.४५, रुम नं.०४, सेक्टर ४ ई, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी मयत झालेल्या आहेत. तसेच अर्जदार नं.१ व २ यांची आजी कै.बनुबाई भाऊ वाघ या सन १९९२ साली मु.पो.लिंब, ता. व जि.सातारा येथे मयत झालेल्या असून त्यांची सरकारी दप्तरी नोंद केलेली नाही. कै.विठ्ठल ज्ञानू यमगर यांच्या नावाने सिडको कार्यक्षेत्रात खालील वर्णनाची मिळकत सिडकोकडे नोंदीत आहे. सदर मिळकती संदर्भात वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी मे.कोर्टास अर्ज केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड येथील सिडको हद्दीतल के.एल.४, रुम नं.०४, बिल्डींग नं.४५, सेक्टर नं.४ ई, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड**

वरील मिळकती संदर्भात अर्जदार यांच्या नावाने वारस दाखला देण्याबाबत कुणाची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास वारस दाखला अर्जदारांच्या नावे प्रदान करण्यात येईल.

आज दि.२/०९/२०२१ रोजी कोर्टाच्या सही शिक्क्याने दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**
कोर्टाचा शिक्का
**सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मा.गोडसे साहेब
ॲड.रुपाली पाटील

## जाहीर नोटीस

मा.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, पनवेल यांचे कोर्टात, पनवेल
चौ.अर्ज क्र.८६४/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२४/११/२०२१

१) श्रीमती.उर्मिला प्रवीण मकवाना
वय : ७० वर्षे, व्यवसाय : गृहिणी
२) श्री.गौरव प्रवीण मकवाना
वय : २९ वर्षे, व्यवसवाय : नोकरी
वरील दोघेही रा.ए-९, सुखशांती अपार्टमेंट,
तांबेनगर, एस.एन.रोड, मुलुंड-वेस्ट, मुंबई-४०००८०
३) श्रीमती.तन्वी मुकेश बेगड
वय : ३३ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.कृष्णा वृंदावन, बी विंग, रुम नं.२२,
आर.आर.टी.रोड, मुलुंड-वेस्ट, मुंबई-४०००८०
४) श्रीमती.रिचा महेश सापरिया
वय : ३१ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.रुम नं.३, श्री महेश बिल्डींग, एस.पी.रोड,
चायना गार्डन, मुलुंड-ईस्ट, मुंबई-४०००८१ ... अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही ... सामनेवाले

वरील अर्जदार १ यांचे पती व अर्जदार २-४ यांचे वडील मयत कै. श्री.प्रवीण गोविंद मकवाना यांचे दि.२६/०७/२०२० रोजी मुंबई येथे निधन झाले. अर्जदार त्यांचे पत्नी व मुले असून सदर मयताच्या नावे असलेली मिळकत खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : भाताण, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | ६२ | १/ब | ४५-७३-२० पो.ख. २६-७६-०० | ६४.१७ |

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदाराने वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताच्या मिळकतीचा वारस म्हणून दाखला देण्यात येईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२४/०८/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**
कोर्टाचा शिक्का
**सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

## संक्षिप्त...

### माथेरानचा सुपुत्र अभिषेक रवी बिरामणे इंजिनिअरिंग परीक्षेत उत्तीर्ण

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान या डोंगर भागात वसलेल्या खेडे वजा शहर अशा ठिकाणी दहावी पर्यंतचे शिक्षण घेऊन पुढील महाविद्यालयीन शिक्षणासाठी अन्य ठिकाणी जात असतात यातून काहींनी आपली उत्तम प्रकारे प्रगती केली असून अनेकजण चांगल्या हुद्द्यावर कार्यरत आहेत तर काही मुले आपल्या घर–गूती परिस्थिती मुळे महाविद्यालयीन शिक्षणापासून वंचित असल्यामुळे नाईलाजाने इथेच काहिनाकाही मोलमजुरी करून कुटुंबाचा चरितार्थ भागविण्यासाठी कष्ट करीत आहेत. ज्या मुलांच्या पालकांची परिस्थिती उत्तम आहे ती मुले विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी पार पाडत असून गावाचे नाव उंचीवर नेण्यासाठी पुरेपूर प्रयत्न करताना दिसत आहे.



माथेरानचे सुप्रसिद्ध जॉकी (घोडेस्वार) रवी बिरामणे यांचे चिरंजीव अभिषेक बिरामणे हा सिव्हिल इंजिनियरिंगच्या अंतिम वर्षात डिसटिनक्षण सह अंतिम वर्षाची परीक्षा उत्तीर्ण झाला आहे पुणे येथील सुप्रसिद्ध आनंदराव पवार कॉलेज मधून शिक्षण पूर्ण केले व तात्काळ नोकरीवर रुजू सुद्धा झाला आहे. अभिषेकच्या पुढील वाटचालीसाठी विविध माध्यमातून त्याच्यावर शुभेच्छाचा वर्षाव केला जात आहे. निवृत्त प्राध्यापक सुनील शिंदे यांनी अभिषेकच्या जिद्द आणि चिकाटी मुळे जे काही इंजिनियरिंग परीक्षेत यश मिळवले आहे त्याबद्दल त्याचे आणि पालकांचे विशेष कौतुक केले आणि पुढील काळात अशाचप्रकारे यशाची शिखरे पादाक्रांत करावी असे सुचित केले आहे.

### नांदगाव, नागशेत विद्यालयात शैक्षणिक साहित्याचे वाटप

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

टाटा कॅपिटल व सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव व कोंडजाई हायस्कूल नागशेत येथील गरीब गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कोरोना काळात शाळा बंद आहेत.तरीही तालुक्यातील गरीब आणि गरजू विद्यार्थी शिक्षणापासून तसेच आपल्या आर्थिक परिस्थितीमुळे दूर राहू नये म्हणून टाटा कॅपिटल व सुधागड रहिवाशी सेवा संघ ठाणे गेली चार वर्षे शैक्षणिक साहित्याचे वाटप करीत अली आहे. ही संस्था सुधागड तालुक्यात विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, भौतिक सुविधा, उपलब्ध करून देत आहे. या संघाचे सदस्य याच तालुक्यातील असल्यामुले आपल्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची गरज ओळखून नेहमी मदत करत आले आहेत. टाटा कॅपिटलचे महाडिक सर तर प्रत्येक विद्यार्थ्यां जवळ संवाद साधून त्यांच्या गरजा शोधत असत .तसेच अध्यक्ष विठ्ठल घाडगे हे देखील नेहमी विद्यार्थ्यांना कोणत्या भौतिक सुविधांची गरज आहे याची चौकशी करीत असतात.या संस्थेने चक्रीवादळाने शाळेचे छप्पर उडाले होते त्यासाठी लागणारा निधी उपलब्ध करून दिला.

# पर्यटकांना सोयीसुविधा देण्यासाठी नगरपरिषदेचा पुढाकार

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मध्ये येणाऱ्या पर्यटकांना उत्तम प्रकारे सेवासुविधा उपलब्ध व्हाव्यात जेणेकरून इथे पर्यटकांची संख्या वाढून सर्वांना चांगल्या पद्धतीने व्यवसायाचे साधन निर्माण होऊ शकते यासाठी नगरपरिषदेच्या माध्यमातून सर्वतोपरी प्रयत्न केले जाणार आहेत असे मत नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांनी व्यक्त केले आहे. येथील जनसंपर्क कार्यालयात आयोजित केलेल्या एका छोटेखानी कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी टॅक्सी संघटनेचे पदाधिकारीआणि नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. भूतकाळात असलेले माथेरान आणि यापुढे वर्तमानातील माथेरान हे खूपच प्रगतिपथावर जात असून सर्व जबाबदार व्यक्तींच्या सहकार्यामुळे हे शक्य होत असल्याचे नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांनी स्पष्ट केले.यावेळी नगरपालिका गटनेते प्रसाद सावंत, टॅक्सी संघटनेचे अध्यक्ष सनी चंचे,उपाध्यक्ष यशवंतराव मोरे, माजी अध्यक्ष अनिल सुर्वे, भगवान म्हसकर, महेंद्र बाथीम,संदीप शेलार, निसार मुजावर, अमित कदम, साजिद घोंगरे, मंगेश भागीत तसेच स्थानिक नागरिक दिलीप सकपाळ, सिताराम शिंदे, अशपाक बढाणे ,समीर पन्हाळकर, सिताराम कुंभार, अख्तर खान, राजा काळे,आदी उपस्थित होते.



माथेरानचे मुख्य प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरी नाक्यावर ज्या पद्धतीने तेथील व्यावसायिक दिशाभूल करीत आहेत पर्यटकांना घाटात आपल्या स्वतःच्या गाडया पार्क करून येणाऱ्या पर्यटकांना अनेकदा जबरदस्तीने खोटेनाटे सांगून पैसे उकाळण्याचे प्रकार सध्या सर्रासपणे सुरू आहेत त्यावर कुणाचाही अंकुश नाही त्यामुळे याचा नाहक त्रास स्थानिकांना तसेच टॅक्सी व्यवसायावर निश्चितपणे होण्याची शक्यता नाकारता येत नाही. एखादया पर्यटकांची स्वतःची गाडी येत असेल तर त्यामागे लोंढेच्या लोंढे धावत असतात त्यामुळे पर्यटकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत असते. यासाठी ताबडतोब पाऊले उचलावीत जेणेकरून या सुंदर स्थळाची प्रतिमा मलिन होणार नाही असे टॅक्सी संघटनेचे माजी अध्यक्ष अनिल सुर्वे यांनी नगराध्यक्षा सावंत यांच्या निदर्शनास आणून दिले. त्यावर

नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांनी रायगड पोलीस अधीक्षक यांना फोन द्वारे ही सविस्तरपणे माहिती देऊन माथेरान मधील या गंभीर प्रश्नाकडे लक्ष केंद्रित करावे असे सांगितले.

दस्तुरी नाक्यावर ज्या पद्धतीने पर्यटकांची दिशाभूल केली जात आहे त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी लवकरच डिजिटल अँप तयार करण्यात येणार असून हे स्टिकर अँप प्रत्येक टॅक्सीमध्ये लावण्याचा मानस असून हे स्टिकर अँप स्कॅनिंग केल्यावर पर्यटकांना माथेरान मधील बरीचशी माहिती आणि महत्त्वाचे फोन नंबर प्राप्त होणार आहेत त्यामुळे जर कुणीही पर्यटकांची दिशाभूल अथवा अव्वाच्या सव्वा रक्कम घेत असेल अशांवर कारवाई केली जाईल. असे गटनेते प्रसाद सावंत यांनी सांगितले. त्याचप्रमाणे ऐन गर्दीच्या काळात मोटार गाड्या पार्क करण्यासाठी जागा अपुरी पडते त्यासाठी दस्तुरी जवळील गव्हर्नर हिल या ठिकाणी भव्य पार्किंग लवकरच उभारली जाणार आहे त्याजागी जवळपास दीडशे गाड्या पार्क होऊ शकतात तर दस्तुरी येथील बोरीचे मैदान इथे स्पायरल पार्किंगची व्यवस्था करण्यासाठी वन समिती सुध्दा सकारात्मक असून बी. ओ. टी अंतर्गत बांधा, वापरा आणि हस्तांतर करा या तत्वावर हा एक स्तुत्य उपक्रम राबविण्यात येणार आहे त्यामुळे दस्तुरी वर वाहनांची पार्किंग समस्या मार्गी लागण्याची चिन्हे स्पष्ट होणार आहेत.असेही प्रसाद सावंत यांनी स्पष्ट केले.

त्यातच या भागातील भूखंड क्रमांक एम.पी.९३हा रिक्त प्लॉट येत्या ऑक्टोबर महिन्यात नगरपरिषदेच्या ताब्यात येण्याचे काम अंतिम टप्प्यात आलेले आहे त्याबाबत सर्व पत्रव्यवहार जिल्हाधिकारी कार्यालयाकडे केलेले आहेत. मुख्यतः येणाऱ्या पर्यटकांच्या वाहनांची सोय लवकरच उपलब्ध झाल्यास इथे मोठया प्रमाणावर पर्यटकांचा भरणा आपसूकच वाढणार असून खऱ्या अर्थाने आर्थिक सुबत्ता, प्रत्येकाच्या हाताला काम मिळणार आहे.

## ग्रामीण भागात मासेमारीला आलेत सुगीचे दिवस

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

सध्या सुरू असलेला श्रावण महिना व त्याच्यासोबत चालू असलेल्या ऊन–पावसाच्या खेळात ग्रामीण भागात मासेमारी करणाऱ्यांसाठी जणू सुगीचे दिवस आले असल्याचे पहावयास मिळत आहे.

पावसाळा सुरू झाल्याबरोबर सुरुवातीला पावसाचे पाणी ठिकठिकाणी साठल्यामुळे नदीप्रवाहातून आलेले मासे मारण्यासाठीची एकच लगबग ग्रामीण भागात दिसून येत होती. तर सध्या श्रावण महिन्यात देखील मासेमारीला सुगीचे दिवस आले असल्याचे पहावयास मिळत आहे.

यंदाच्या मोसमी पावसाने जूनच्या पहिल्या आठवड्याचा मुहूर्त साधत हळूहळू बरबायला सुरुवात केली. तर पुढे बरेच दिवस उलटून गेले तरी मुसळधार स्वरुपात व माश्यांची वल्गन चढेल अशाप्रकारचा समाधानकारक पाऊस न पडल्याने खवय्यांची मात्र निराशाच झाली होती. तर खवय्ये आपली मासे खाण्याची इच्छा भागविण्यासाठी मिळेल ते डबके, नदी, नाले आशा ठिकाणी मिळतील ते मासे पकडून आपली मनाची इच्छा पुर्ण करीत असल्याचे दिसून येत होते.

सध्या श्रावण महिना सुरु असून कधी धो धो पाऊस तर ऊन–पावसाचा खेळ सुरु आहे. अशा परिस्थितीत ग्रामीण भागातील युवा वर्गाला मात्र मासेमारीसाठी सुगीचे दिवस आले असल्याचे दिसून येत आहे.

त्यातच कोरोना महामारीमुळे सध्या काही जणाचे कामधंदेही बंद असल्याने एक विरंगुळा तसेच पोटापाण्याची व्यवस्था म्हणून ग्रामीण युवा वर्ग मात्र मासेमारी करताना दिसत आहेत.

## कोलाड, खांब, नागोठणे परिसरातील छोटे व्यापारी या वर्षीही वाऱ्यावरच

**दै.रायगड नगरी । गोवे–कोलाड**

पनवेल ते इंदापूर या महामार्गाचे काम गेल्या दहा वर्षापासून अगदी धिम्या गतीने सुरू असल्यामुळे रस्त्यालगत असलेल्या वडिलोपार्जित व्यवसायावर गेल्या दहा वर्षापासून लहान व्यापारी तसेच टपरी धारकांवर मोठे संकट आले आहे.



पनवेल ते इंदापूर दरम्यान नागोठणे, सुकेली, खांब, कोलाड, तळवली तसेच इंदापूर दरम्यान अनेक टपरीधारक वडापाव, कटलरी, किरकोळ सामान, भाजी, फळ विक्रेते आदिं गेल्या दहा वर्षापासून आपली स्वतःची जागा रस्त्याच्या रुंदीकरणा मध्ये गेल्याने इतरत्र जागेत जेमतेम व्यवसाय करत आहेत. काही या हायवे मध्ये भुसंपदीत झालेल्या व्यवसयिकांना शासनाकडून जागा देण्याचे कबूल केले होते परंतु त्याचा ही अद्याप पत्ताच नाही. त्यात गेल्या वर्षापासून कोरोना मुळे मोठी मंदीची लाट पसरली आहे. गणपती, गोविंदा, दिवाळी, होळी या सणांमध्ये बऱ्यापैकी गिऱ्हाईक बाजारात खरेदीसाठी येत असतात. मात्र गेल्या दहा वर्षापासून आपली स्वतःची जागा सोडून इतरत्र दुकाने हलवावी लागल्यामुळे या व्यवसायावर मोठा परिणाम झालेला आहे. कुटुंबाचा उदर निर्वाह कसा करायचा असा गंभीर प्रश्न त्यांना पडला आहे.? १० सप्टेंबरला गणपती सण सुरू होणार आहे. आपल्याला आपली हक्काची जागा नसल्यामुळे आम्ही दुकान पावसात कोठे मांडणार असा ज्वलंत प्रश्न लहान व्यापाऱ्यांना पडला आहे. किती दिवस आर्थिक नुकसान सहन करायचा असा प्रश्न रस्त्यालगत व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांना पडला आहे.

---

राव साहेब

अर्जदारातर्फे वकील
ॲड.आशिष पनवेलकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.११३१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१३/१०/२०२१

कै.चमनलाल बेचन यादव (मयत) यांचे वारस
१) सौ.सुशिला चमनलाल यादव
वय : ५८, व्यवसाय : गृहिणी
रा.घर नं.४४८, साईबाबा मंदिर जवळ
गाव–पडघे, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्री.चंद्रशेखर चमनलाल यादव
वय : ३२, व्यवसाय : नोकरी
रा.घर नं.४४८, साईबाबा मंदिर जवळ,
गाव–पडघे, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्री.रामोद चमनलाल यादव
वय : ३०, व्यवसाय : नोकरी
रा.घर नं.४४८, साईबाबा मंदिर जवळ
गाव–पडघे, ता.पनवेल, जि.रायगड
४) श्री.अजय चमनलाल यादव
वय : २६, व्यवसाय : नोकरी
रा.घर नं.४४८, साईबाबा मंदिर जवळ
गाव–पडघे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार क्र.१ व ४

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीशीने सर्व जनतेस कळविण्यात येते की, कै.चमनलाल बेचन यादव (मयत) यांचे वारस अर्जदार क्र.१ ह्या त्यांची पत्नी असून अर्जदार क्र.२ ते ४ ही त्यांची मुलगे आहे. यांच्याशिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. कै.चमनलाल बेचन यादव यांचा मृत्यू दि.०५/१०/२०१८ रोजी शुभम स्पेशालिटी हॉस्पिटल खाजुराई वारणसी येथे निधन झाले.

**कै.चमनलाल बेचन यादव यांच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे**

| गाव | मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे वर्णन | क्षेत्रफळ | तालुका | जिल्हा |
|---|---|---|---|---|---|
| पडघे | ४४८ | अर्धे पक्के घर | ९६० चौ. फुट | पनवेल | रायगड |

येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन असून सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदारांशिवाय कोणीही या मिळकतीला वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर वकीलांमार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१ माहे ९ सन २०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

राव साहेब

ॲड.धाडस चं. भोपी, पनवेल
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.११२७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०७/१०/२०२१

शंकर स्वामीनाथन
वय : ६७ वर्षे, व्यवसाय : निवृत्त,
रा.ए–८०१, एशियन गॅलेक्सी, प्लॉट क्रं.२०४,
सेक्टर १०, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

१) कुमारी.सुभा शंकर
वय : ३१ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.ए–८०१, एशियन गॅलेक्सी,
प्लॉट क्रं.२०४, सेक्टर १०, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड
सध्याचा पत्ता : २०८, अमेरिका बुलेवार्ड,
ॲशलॅन्ड एमए–०१७२१–१८७६,
युनायटेड स्टेटस ऑफ अमेरिका
२) श्री.श्याम शंकर
वय : ३७ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.बी–३०४, बालाजी कॉम्प्लेक्स,
एच.पी.पेट्रोल पंपाजवळ, सेक्टर ४६ ए,
नेरुळ नोड III, ठाणे–४००७०६
सध्याचा पत्ता : ४३२२, प्रॉविडन्स टेरेस,
फ्रिमॉन्ट, सीए–९४५३८,
युनायटेड स्टेटस ऑफ अमेरिका — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्रं.१ यांची पत्नी व सामनेवाला क्रं.१ व २ यांची आई कै.भगवती शंकर यांचे निधन दि.१५/०४/२०१९ रोजी बी.ए.आर.सी. हॉस्पिटल, मुंबई येथे झाले आहे. कै.भगवती शंकर यांना हिंदू वारसा कायद्याप्रमाणे अर्जदार क्रं.१ व सामनेवाला क्रं.१ व क्रं.२ हेच कायदेशीर वारसदार आहेत.

२) अर्जदार व कै.भगवती शंकर यांच्या संयुक्त नावे असलेल्या मौजे : खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील पनवेल महानगरपालिका हद्दीतील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**सदनिका क्रं.ए–८०१, एशियन गॅलेक्सी, आठवा मजला, प्लॉट क्रं.२०४, सेक्टर १०, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकत.**

वर नमूद मिळकतीचे एकूण क्षेत्र ८७ २०९+४.१७३ (टेरेस) चौ.मीटर चटई क्षेत्र म्हणजेच १०४.६५०८+५.००७६ (टेरेस) चौ.मीटर बिल्टअप क्षेत्र अशा वर्णनाची निवासी सदनिका

वर नमूद अर्जदार शंकर स्वामीनाथन व सामनेवाले कुमारी.सुभा शंकर आणि श्री.श्याम शंकर, हे कै.भगवती शंकर यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार शंकर स्वामीनाथन व सामनेवाले कुमारी.सुभा शंकर आणि श्री.श्याम शंकर यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.भगवती शंकर यांच्या वारस दाखल्यास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.१/९/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मे.भाकरे साहेब यांचे कोर्टात
अर्जदाराचे वकील : ॲड.राहूल दत्तात्रेय मोकल

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.९८३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०५/१०/२०२१

१) श्रीमती.विद्या दत्तात्रेय पाटील
वय : ४८ वर्षे, व्यवसाय : शेती
रा.पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्रीमती.दिप्ती दत्तात्रेय पाटील
वय : २५ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
रा.पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्रीमती.नम्रता दत्तात्रेय पाटील
वय : २३ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
रा.पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड
४) श्रीमती.अनुराधा दत्तात्रेय पाटील
वय : १९ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
रा.पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की, अर्जदार क्रं.१ ह्या मयत दत्तात्रेय हरिश्चंद्र पाटील यांच्या पत्नी असून अर्जदार क्र.२ ते ४ ह्या मयत दत्तात्रेय हरिश्चंद्र पाटील यांच्या कन्या आहेत. मयत दत्तात्रेय हरिश्चंद्र पाटील हे दि.२९/०७/२०२० रोजी मयत झालेले आहे. तसेच मयत दत्तात्रेय हरिश्चंद्र पाटील ह्यांचे आई ताराबाई हरिश्चंद्र पाटील ह्या दि.०४/०७/२०१८ रोजी मयत झालेल्या आहेत. मयत दत्तात्रेय हरिश्चंद्र पाटील हे हयात असताना त्यांच्या मृत्यूसमयी त्यांचे नाव असणाऱ्या सामाईक मालकीच्या, ताबेकब्जा वहिवाटीतील व कसवणुकीतील असणाऱ्या शेतजमीन मिळकती आहेत. त्या जमीन मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे

**जमीन मिळकतींचे वर्णन**
**मौजे : पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | युनिट केस क्र. |
|---|---|---|---|---|
| १ | १६ | २ | ०.१७.२ | प्रकरण क्रमांक–पारगाव युनिट केस क्र.२६ |
| २ | १९ | ४ | ०.१६.० | |
| ३ | ८ | ४ | ०.३८.६ | |
| ४ | ८५ | ६ | ०.१८.७ | |
| ५ | ९ | ४ | ०.१४.७ | |

उपरोक्त वर्णन केलेली जमीन मिळकती ह्या पनवेल बंदरापलिकडील आणि ठाणे खाडीपलिकडील भूभागाच्या औद्योगिक, वाणिज्यिक व निवासी प्रयोजनासाठी आणि सुनियोजित विकासाकरिता महाराष्ट्र शासनातर्फे सिडकोने ''नवी मुंबईचे नवीन शहर'' या नावाने शासनाने स्थळ निर्देशित केलेल्या व विशेषत्वाने नवी मुंबई प्रकल्पांतर्गत उभारण्यात येणाऱ्या नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामासाठी संपादीत केलेली असून त्याचे भूसंपादनाचा निवाडा क्रमांक–पारगाव, युनिट केस क्र.२६ ने जाहीर झालेला आहे.

वर वर्णन केलेल्या सामाईक मिळकतीस मयत दत्तात्रेय हरिश्चंद्र पाटील यांच्या पश्चात त्यांस अर्जदार हेच वारस आहेत. वरील प्रमाणे जमीन मिळकतीचे वर्णन असून सदरहू जमीन मिळकतीचे अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार हे मयत दत्तात्रेय हरिश्चंद्र पाटील यांचे वारस नाहीत अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह मे.न्यायालयात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही, असे गृहीत धरुन मे.न्यायालय अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१६/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

ये.का.मु.२,००,०००.२००८.पीए ४ जे २७० — दिवाणी अ.१५० रा
शा.नि.न्या.वि.क्र.११७९ दिनांक १.२.१२ — Civ.A 150 m
वारसाचे सर्टीफिकेटबद्दल जाहीरनामा — ॲड.राजेश आर.चौधरी
प्रोसेस जमा रु.५०/– — अर्जदार यांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश सो. (व) स्तर यांचे कोर्टात
चौ.अर्ज क्र.६५१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०६/१०/२०२१

श्री.गणेश गोपीचंद चव्हाण व इतर — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

वरील अर्जदार क्रमांक १ ते ४ हे कै.आशा गोपीचंद चव्हाण दि.०२/०२/२०२० रोजी राहत्या घरी कळंबोली येथे निधन झाले आहे. मयत कै.आशा गोपीचंद चव्हाण यांच्या मालकीचे असलेले मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मालमत्तेचे वर्णन**

१) सदनिका क्रं.३०५, तिसरा मजला, सिद्धेश्वर हाईटस्, प्लॉट नं.२२०+२२१, सेक्टर २१, कामोठे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड क्षेत्रफळ ५२६ चौ.फूट कारपेट + १३४ चौ.फूट बाल्कनी वरील उपरोक्त मिळकत कै.आशा गोपीचंद चव्हाण आणि श्री.गणेश गोपीचंद चव्हाण यांनी मेसर्स शांती डेव्हलपर्सचे मालक श्री.महेश शंकर माटे यांच्याकडून दि.२०/०७/२०११ रोजी पनवेल–३–०७३७७–२०११ ॲग्रीमेंट फॉर सेल या करारनाम्याद्वारे खरेदी केली आहे. सदर मिळकत ही आशा गोपीचंद चव्हाण आणि श्री.गणेश गोपीचंद चव्हाण यांच्या नावे आहे. (सदर मिळकतीचे बाजार मुल्य रक्कम १८,००,०००/–) हिस्सा–मयत व्यक्तीचा ५० टक्के हिस्सा व अर्जदार नं.१ चा ५० टक्के हिस्सा.

२) दुकान नं.२७, पलॉट नं.११९, तळमजला, बीमा ऑफिस प्रिमाइसेस को.ऑप.सोसायटी, कळंबोली, नवी मुंबई तालुका पनवेल जिल्हा रायगड क्षेत्रफळ १८.४० चौ.मी. वरील उपरोक्त मिळकत कै.आशा गोपीचंद चव्हाण आणि श्री.गणेश गोपीचंद चव्हाण यांनी विजया सुखदेव सावलकर यांच्याकडून दि.१७/०१/२००८ रोजी उरण–पनवेल–२–००५१४–२००८ रोजी डीड ऑफ असाईनमेंट या करारनाम्याद्वारे खरेदी केली आहे. सदर मिळकत ही आशा गोपीचंद चव्हाण आणि श्री.गणेश गोपीचंद चव्हाण यांच्या नावे आहे. (सदर मिळकतीचे बाजार मुल्य रक्कम १९,००,०००/–) मयताचा ५० टक्के हिस्सा आणि अर्जदार नं.१ चा हिस्सा.

३) सदनिका क्रं.२०१, दुसरा मजला, अनंत रेसिडेन्सी, प्लॉट नं.९०, सेक्टर १६ ई, कळंबोली, नवी मुंबई तालुका पनवेल, जिल्हा रायगड, क्षेत्रफळ २६.७५० चौ.मी. कारपेट आणि सी.बी.२.२१३ चौ.मी. आणि एफ.बी. ३.६७५ चौ.मी. आणि टेरेस ४.०५० चौ.मी. वरील उपरोक्त मिळकत कै.आशा गोपीचंद चव्हाण आणि श्री.गणेश गोपीचंद चव्हाण यांनी मे फोनिक्स डेव्हलपर्स तर्फे पार्टनर श्री.महेश नरसिंग चौधरी यांच्याकडून दि.२९/१०/२०१४ रोजी पनवेल–१–५२५८–२०१४ रोजी ॲग्रीमेंट फॉर सेल या करारनाम्याद्वारे खरेदी केली आहे. सदर मिळकत ही आशा गोपीचंद चव्हाण आणि श्री.गणेश गोपीचंद चव्हाण यांच्या नावे आहे. (सदर मिळकतीचे बाजार मुल्य रक्कम १८,००,०००/–) मयताचा ५० टक्के हिस्सा आणि अर्जदार क्र.१ चा ५० टक्के हिस्सा आहे.

४) सदनिका क्रं.ई–६६/०:३, तळमजला, सेक्टर ६, बिल्डींग ई टाईप, सेक्टर ६, कळंबोली, तालुका पनवेल जिल्हा रायगड ४१०२१८ क्षेत्रफळ ५०.०६ चौ.मी. वरील मिळकत कै.आशा गोपीचंद चव्हाण यांनी रेबेलो एडविन बेंजामिन यांच्याकडून दि.०२/०६/१९९९ रोजी पनवेल–१७८४ डीड ऑफ असाइनमेंट या करारनाम्याद्वारे खरेदी केली आहे. सदर मिळकत ही आशा गोपीचंद चव्हाण यांच्या नावे आहे. (सदर मिळकतीचे बाजार मुल्य रक्कम ५०/–) मयताचा ५०% हिस्सा आहे.

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी.

वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदाराच्या विनंती प्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२/९/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

## संक्षिप्त...

### पाण्याच्या हौदात पडून १२ वर्षीय मुलाचा मृत्यू

दै.रायगड नगरी । पनवेल

विचुंबे येथे पाण्याच्या हौदात पडून बारा वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. अर्पित अंकुश जाधव असे या मृत मुलाचे नाव आहे. या घटनेची नोंद खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

ज्ञानेश्वर माऊली सोसायटी विचुंबे, नवीन पनवेल येथे राहणारा अर्पित अंकुश जाधव हा घराबाहेर खेळायला गेला होता. तो पाण्याच्या हौदात पडला. यावेळी त्याला आजूबाजूच्या लोकांनी बाहेर काढले. पाण्यातून बाहेर काढल्यानंतर अर्पित याला पनवेल उपजिल्हा रुग्णालय येथे नेण्यात आले.

डॉक्टरांनी त्याला तिथे मृत घोषित केले. मतिमंद असलेल्या अर्पितच्या अचानक जाण्यामुळे त्याच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.


### पाण्याच्या हौदात पडून १२ वर्षीय मुलाचा मृत्यू

दै.रायगड नगरी । पनवेल

विचुंबे येथे पाण्याच्या हौदात पडून बारा वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. अर्पित अंकुश जाधव असे या मृत मुलाचे नाव आहे. या घटनेची नोंद खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.


सोमवार ३० ऑगस्ट रोजी ज्ञानेश्वर माऊली सोसायटी विचुंबे, नवीन पनवेल येथे राहणारा अर्पित अंकुश जाधव हा घराबाहेर खेळायला गेला होता. तो पाण्याच्या हौदात पडला.

यावेळी त्याला आजूबाजूच्या लोकांनी बाहेर काढले. पाण्यातून बाहेर काढल्यानंतर अर्पित याला पनवेल उपजिल्हा रुग्णालय येथे नेण्यात आले. डॉक्टरानी त्याला तिथे मृत घोषित केले. मतिमंद असलेल्या अर्पितच्या अचानक जाण्यामुळे त्याच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.


**वाचकांना विनम्र सूचना**

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


**शेकडो महिलांना मिळतोय रोजगार**

# गौरीच्या निर्मितीसाठी महिलांचा हातभार

दै.रायगड नगरी । पेण

संपूर्ण जगात गणेशमूर्तींचे माहेरघर म्हणून प्रसिद्ध असलेल्या पेण तालुक्यात गणेशमूर्ती बरोबरच गौरी मुर्तींची निर्मिती देखील केली जाते. विशेष म्हणजे या गौरींच्या निर्मितीसाठी गणेशमूर्तीकारांच्या घरातील महिला म्हणजेच गौरी देखील मेहनत घेताना दिसत आहेत.

काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या गणेशोत्सवासाठी पेण तालुक्यांतील कारखान्यात गणेशाच्या मूर्ती आकार घेऊ लागल्या आहेत. सध्या रंगरंगोटीचे काम अंतिम टप्प्यात आहे. गणेशमूर्तिकारांचे गाव म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या पेणमधून यावर्षी जवळपास २५ ते ३० लाख गणेशमूर्ती देशभरासह विविध राज्य व परदेशात पाठवण्यात येतात. डोळ्यांची सुबक आखणी, आकर्षक रंगसंगती आणि देखणी मूर्ती हे पेणमधील गणेशमूर्तींचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे पेणच्या गौरी गणपतीच्या मूर्तीना केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशविदेशातूनही मागणी वाढत आहे. पूर्वी पेण शहरापुरता मर्यादित असणारा हा व्यवसाय आज तालुक्यातील विविध भागांत मोठ्या प्रमाणात पसरला आहे. जोहे, हमरापूर, कळवे, दादर, तांबडशेत, अंतोरे, दिव, उंबर्डे आदी गावांत शेकडो कारखाने तयार झाले आहेत. तर जोहे-हमरापूर गणेशमूर्तीचे हब म्हणून ओळखले जाते.



> गौरी-गणपतीच्या मूर्तीमुळे आमच्या पेण मधील गावागावातील शेकडो महिलांना रोजगार मिळाला आहे. आम्ही मुखवटे बनविणे, कपडा कलर, डोळ्यांची आणखी, सोनेरी शाई लावणे बरोबर शेडिंग ही करतो.
>
> **- प्रीती सागर पाटील, पेंटर, जोहे, पेण**

गणेशमूर्ती बरोबरच गौरींच्या मूर्ती देखील त्याच कलाकुसरीने बनविल्या जातात.

गणपतीबरोबर येणाऱ्या गौरी सणाला एक वेगळं वलय आहे. यामध्ये गौरींची स्थापना करुन त्यांचे मनोभावे पूजन करण्यात येते. प्रत्येक कुटुंबात आपल्या कुलाचाराप्रमाणे गौरी बसविल्या जातात. पहिल्या दिवशी घरातील तुळशीपासून पावला-पावलांनी डोक्यावरून या गौरींना घरात आणले जाते. गौरी मूर्ती निर्मितीसाठी गणेशमूर्ती कारखान्यातील महिला पुढे सरसावल्या आहेत. ज्या कल्पकतेने, कलाकुसरतेने पुरुष कलाकार गणेशमूर्ती साकारतात त्याच कल्पकतेने व कलाकुसरतेने या महिला कलाकार गौरींचे मुखवटे साकारतात. पेण तालुक्यातील अंतोरे गावातील गावदेवी कला केंद्रातील अमृता लांगी या मागील अनेक वर्षांपासून आपल्या कारखान्यात गौरींचे मुखवटे साकारत आहेत. गणेश मुर्ती सारख्या गौरीच्या मूर्तींची देखील सुबक आखणी, आकर्षक रंगसंगती व विविध प्रकारच्या गौरीचे मुखवटे साकारले जात आहेत. हे मुखवटे साकारण्यात कारखान्यातील इतर महिलांचाही मोठा सहभाग असतो. या गौरी-गणपतीच्या मूर्तींमुळे तालुक्यातील असंख्य महिलांना रोजगार मिळाला आहे.

> मागील अनेक वर्षा पासून गणेशमूर्तीचे बरोबर गौरीच्या मूर्तींना देखील मागणी वाढली आहे. सुबक आखणी, आकर्षक रंगसंगती व विविध प्रकारच्या मूर्ती मुळे गुजरात, पुणे, मुंबई व विशेषतः कोकणात गौरींना जास्त मागणी आहे.
>
> **- अमृता अजित लांगी, गावदेवी कला केंद्र, अंतोरे, पेण**

## इक्रा स्टिल ट्यूब प्रा.लि. कंपनीचे जवळपास ३३ लाखांचा परतावा पनवेल शहर पोलिस व बँकेमुळे मिळाला परत

दै.रायगड नगरी । पनवेल

शहरातील इक्रा स्टिल क्यूब प्रा.लि. कंपनीची फसवणूक करून काही अज्ञात इसमांनी त्यांच्या खात्यातून जवळपास ३३ लाख २९ हजार ४७९ रुपये स्वतःच्या खात्यात वळते केले होते. परंतु या संदर्भात सदर कंपनीचे मालक ईकबाल काझी यांना माहिती मिळताच त्यांनी आपली फसवणूक होऊन खात्यातून चूकीचे पैसे दुसऱ्याने वळते केल्याची तक्रार पनवेल शहर पोलिस व बँकेला दिली असता तांत्रिक तपासाच्या आधारे पनवेल शहर पोलिसांनी शोध घेऊन तसेच बँकेच्या सहकार्यामुळे त्यांच्या खात्यातून वळते झालेले दुसऱ्या खात्यातील पैसे पूर्णतः त्यांना परत मिळाले आहेत.

सदर अज्ञात व्यक्तीने बँकेत फोन करुन माझे चेकबूक संपले आहे. मला औषधासाठी पैसे हवेत त्यासाठी काही पैसे ट्रान्सफर करा असे बँकेच्या संबंधित व्यक्तींशी बोलून तसेच खोटे लटरहेडचा वापर करून त्याद्वारे पैसे पाठविण्याची विनंती करून त्याने त्याच्या अकाऊंटवर २२ लाख आरटीजीएस जमा झाले का तसेच इतर चौकशा करून वेगवेगळ्या प्रकारे त्यांच्या खात्यातून वेगवेगळ्या बँकेच्या खात्यात जवळपास ३३, २९, ४७९ रु. फिरवून घेतले.

या संबंधांचे मेसेज ईक्बाल काझी यांच्या मोबाईलला आल्यावर अशा प्रकारची कोणती रक्कम कंपनीच्या माध्यमातून त्यांनी काढली नसल्याने अज्ञात व्यक्तीने आपली फसवणूक करून आपल्या खात्यातून पैसे वळते करून घेतल्याचे समजले. यासंदर्भात त्यांनी तातडीने पनवेल शहर पोलिस तसेच बँकेच्या संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेऊन वळती झालेली रक्कम वेगवेगळ्या बँकेशी संबंध साधून थांबवून ठेवली. याबाबत अधिकृत तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात देताच सखोल चौकशी करण्यात आली. यात वेगवेगळ्या बँकेत गेलेले १४, ०१, ४०१ रू. हे पैसे त्यांच्या खात्यात जमा झाले.

त्याचप्रमाणे बँकेने अंतर्गत तांत्रिक तपास व चौकशीने तसेच वरिष्ठांशी चर्चा व मार्गदर्शन घेऊन त्यांच्या खात्यात १९, २८, ०७८ रू. जमा केल्याने चुकीच्या पद्धतीने गेलेले पूर्णतः पैसे पुन्हा खात्यात जमा झाल्याने ईक्बाल काझी यांनी पनवेल शहर पोलिस ठाण्याचे वपोनि अजयकुमार लांडगे, पो.नि. (गुन्हे) संजय जोशी, पोलिस उपनिरीक्षक फरताडे त्याचप्रमाणे आयडिबीआय बँक पनवेल शाखेचे अधिकारी व कर्मचारी वर्गाचे त्यांनी आभार मानले आहेत.

## कारला लागलेल्या आगीत कारचे नुकसान

दै.रायगड नगरी । पनवेल

नुकसान करण्याच्या उद्देशाने कारला आग लागून कारचे नुकसान केल्याची घटना कळंबोली रोडपाली येथे घडली आहे. आरोपी विरोधात कळंबोली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रोडपाली, कळंबोली येथे राहणारे जितेंद्र चौधरी यांनी त्यांची कार राहत्या बिल्डिंगच्या बाहेर पार्क करून ठेवली होती. ते गाडी पार्क करून झोपी गेले. यावेळी त्यांच्या वेरणा कारला अज्ञात इसमाने आग लावली. याची माहिती त्यांच्या वोचमेनने जितेंद्र यांना दिली. त्यानंतर बिल्डिंगच्या फायर डिस्टिंग्यूशरने आग विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र आग विझली नाही. त्यामुळे फायर ब्रिगेडला कॉल करण्यात आला. फायर ब्रिगेडची गाडी आल्यानंतर त्यांनी आग विझवली. मात्र तोपर्यंत गाडीचा आतील संपूर्ण भाग जळून गेला होता. या आगीत कार पूर्णपणे जळाली आहे. १४ लाख ८० हजार रुपयांच्या कारचे नुकसान केल्याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांचा पाठपुरावा**

# माथेरानला अनलॉक केल्यामुळे सर्वांनाच रोजगाराच्या संधी उपलब्ध

**टॅक्सी संघटनेकडून नगराध्यक्षांचा भव्य सत्कार**

दै.रायगड नगरी । माथेरान

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्वत्र लॉकडाऊन केल्यामुळे अनेकांना मोठ्या कठीण समस्येचा सामना करावा लागला होता. त्यातच माथेरान हे असे एकमेव पर्यटनस्थळ आहे की जिथे पर्यटनावर सर्वांचे जीवनमान अवलंबून असते कुठल्याही प्रकारचा अन्य स्त्रोत नसल्याने नागरिकांना पर्यटन हीच शेती आहे त्यामुळे लॉक डाऊन काळात पर्यटकांना बंदी केल्यामुळे माथेरानच्या स्थानिकांसह नेरळ माथेरान दरम्यान पर्यटकांना टॅक्सी सेवा उपलब्ध करून देणाऱ्या टॅक्सी चालक मालक वर्गाची सुध्दा एकंदरीत हलाखीची परिस्थिती निर्माण झाली होती.माथेरान मधील युवा वर्ग नाईलाजाने आपल्या कुटुंबाला आधार देण्यासाठी हातगाडीवर अति कष्टदायक कामे करत होते. लॉक डाऊन मुळे सर्वांची आर्थिक घडी पूर्णपणे विस्कळीत झाली होती याकामी कुठल्याही परिस्थितीत हे



पर्यटनस्थळ सुरू झालेच पाहिजे तरच इथल्या नागरिकांसह टॅक्सी चालकांना सुध्दा रोजगार उपलब्ध होऊ शकतो यासाठी माथेरान नगरीच्या उत्तम प्रशासक विद्यमान नगराध्यक्षा प्रेरणा प्रसाद सावंत यांनी याबाबत पालकमंत्री आदिती तटकरे, जिल्हाधिकारी रायगड तसेच राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंची प्रत्यक्ष भेट घेऊन इथली भौगोलिक परिस्थिती लक्षात आणून दिली होती त्यामुळेच अन्य पर्यटनस्थळ यामध्ये महाबळेश्वर, लोणावळा हे बंद असताना सुध्दा केवळ विशेष प्राधान्य घटक म्हणून माथेरानला अनलॉक करण्यासाठी २० जूनला परवानगी देण्यात आली होती.त्यामुळेच या दोन महिन्यांच्या कालावधीत सर्वांची सर्वंकष परिस्थिती पूर्वपदावर आलेली आहे.टॅक्सी वाल्यांची जवळपास २५० कुटुंबे माथेरानच्याच पर्यटनावर येणाऱ्या पर्यटकांवर अवलंबून आहेत. माथेरानला अनलॉक केल्यामुळे सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला होता. आपल्याला ह्या ज्या काही रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत त्या केवळ नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांच्या अथक परिश्रम आणि पाठपुराव्या मुळे शक्य झाल्या आहेत.

इथले घोडेवाले, हातरीक्षा चालक, हमाल तसेच अन्य कष्टकरी लोकांना येणाऱ्या पर्यटकांच्या वाढत्या लोंढ्यामुळे आता चांगल्या प्रकारे उत्पन्न प्राप्त होत आहे.

याकामी टॅक्सी संघटनेच्या पदाधिकारी तसेच सदस्यांनी येथील जनसंपर्क कार्यालयात सायंकाळी पाच वाजता नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांचा पुष्पगुच्छ तसेच छत्रपती शिवाजी महाराजांची फ्रेम देऊन छोटेखानी सत्कार समारंभ आयोजित केला यावेळी टॅक्सी संघटनेचे अध्यक्ष सनी चंचे, उपाध्यक्ष यशवंतराव मोरे, माजी अध्यक्ष अनिल सुर्वे, भगवान म्हसकर, महेंद्र बाथीम, संदीप शेलार, निसार मुजावर, अमित कदम, साजिद घोंगरे, मंगेश भागीत आदी उपस्थित होते.

## वडीलांच्या जीवनावर आधारित 'संघर्ष' पुस्तकाचे प्रकाशन

दै.रायगड नगरी । पोलादपूर

तालुक्यातील चरई येथील मूळचे रहिवासी असलेल्या अशोक महामुनी यांच्या जीवना-तील संघर्षावर आधारित त्यांची कन्या सौ. शीतल महेश माने यांनी लिहिलेल्या 'संघर्ष' या पुस्तकाचे प्रकाशन त्यांना वडीलांच्याहस्ते नजिकच्या काळात पुणे येथे करायचे होते. मात्र, अचानक अल्पशा आजाराने पोलादपूर येथे त्यांचे निधन झाल्याने वडीलांच्या दशक्रिया विधीवेळी आप्तस्वकियांच्या उपस्थितीमध्ये पुस्तकाचे प्रकाशन करण्याची दुर्दैवी वेळ सौ. शीतल माने यांच्यावर आली. या 'संघर्ष' पुस्तकाचे प्रकाशन महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे रायगड जिल्हाध्यक्ष शैलेश पालकर यांच्याहस्ते करण्यात आले.

पुणे येथील पिंपळे सौदागर येथे वास्तव्य असलेल्या शीतल महेश माने यांचे वडील अशोक महामुनी आणि आई सीमा महामुनी यांच्या जीवनातील संघर्षमय वाटचालीवर आधारित कथानक 'संघर्ष' त्यांनी इरा ब्लॉग स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचे नामांकन मिळाले आहे. या पुस्तकाचे शाश्वत प्रकाशन मार्फत छपाईसह अन्य सोपस्कार पुर्ण करण्यात आल्यानंतर सौ.शीतल माने यांना या पुस्तकाचे प्रकाशन कथानायक असलेले वडील अशोक महामुनी यांच्याहस्ते या पुस्तकाचे प्रकाशन व्हावे, असे मनोमन वाटत होते. अशातच, कोविड-१९चे निर्बंध आल्याने नियोजित कार्यक्रम काही काळासाठी लांबणीवर पडला. याचदरम्यान, दि. २३ ऑगस्टरोजी मध्यरात्री अशोक महामुनी यांचे अल्पशा आजाराने पोलादपूर येथे निधन झाले. यामुळे दशक्रियाविधीवेळी दि. १ सप्टेंबररोजी ज्येष्ठ नागरिक सभागृहामध्ये या पुस्तकाचे प्रकाशन आप्तस्वकियांच्या तसेच समाजबांधवांच्या उपस्थितीत स्व.अशोक महामुनी यांचे भाचे व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे रायगड जिल्हाध्यक्ष शैलेश पालकर यांच्या हस्ते करण्यात आले.



## तळोजा मेट्रो स्टेशनला सद्गुरू वामनबाबा महाराज यांचे नाव देण्याची शिवसेनेची मागणी

दै.रायगड नगरी । पनवेल

तळोजा मेट्रो स्टेशनला सद्गुरू वामनबाबा महाराज यांचे नाव देण्याची मागणी शिवसेना रायगड जिल्हा सल्लागार बबनदादा पाटील यांनी सिडकोकडे केली आहे.

याबाबत सिडकोचे एमडी संजय मुखर्जी यांची शिवसेना रायगड जिल्हा सल्लागार बबनदादा पाटील यांनी भेट घेऊन तळोजा मजकूर मठात सद्गुरू वामनबाबा महाराज यांनी अनेक वर्षे तपश्चर्या केली. त्यांच्यामुळे रायगड आणि ठाणे परिसरात वारकरी संप्रदाय वाढविण्याचे फार मोलाचे काम केलेले आहे.

रायगड आणि ठाणे जिल्ह्याचे तळोजा मजकूर हे वारकरी संप्रदायाचे एक शक्तिपीठ बनले आहे. त्यांनी समाज प्रबोधनाला फार मोठे योगदान दिलेले आहे. यापूर्वीही या भागातील ग्रामस्थांनी सिडकोकडे निवेदन दिले आहे. लवकरच मेट्रो काही महिन्यांत सुरू होते असे समजले आहे. तरी तळोजा मेट्रो स्टेशनला सद्गुरू वामनबाबा महाराजांचे नाव द्यावे अशी मागणी त्यांनी केली आहे.



## जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची ऑनलाईन बैठकीत साधक-बाधक चर्चा

दै.रायगड नगरी । अलिबाग

जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक वेब एक्स या दूरदृष्य प्रणालीद्वारे ऑनलाईन पद्धतीने संपन्न झाली.

या बैठकीस समितीचे शासकीय सदस्य या नात्याने जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके,सहाय्यक आयुक्त (अन्न) लक्ष्मण दराडे, जिल्हा वजनमापे नियंत्रक राम राठोड, महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता अजित पिंगळे, पोलीस अधीक्षक कार्यालय, उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, जिल्हा उद्योग केंद्र, स्टेट बँक ऑफ इंडिया या शासकीय कार्यालयाचे प्रतिनिधी हे शासकीय सदस्य तर प्रा.डॉ.संगिता चित्रकोटी, पत्रकार उद्धव आव्हाड, गणेश भोईर, विनायक सारणेकर, सचिन पिंगळे, यशवंत बागूल, डॉ.फरीद चिमावकर, अनंत गुरव, स्नेहा येरुणकर, प्रशांत बच्छाव, अमित कांबळे, नागेश वाकडे, संदीप चाचले, मकरंद जोशी हे अशासकीय सदस्य ऑनलाईन उपस्थित होते.

बैठकीच्या सुरुवातीला जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके यांनी उपस्थित सर्वांचे स्वागत केले व अशासकीय सदस्यांना त्यांच्या जिल्हा ग्राहक संरक्षण संबंधीच्या अडीअडचणी तसेच काही सूचना असल्यास त्या मांडण्याबाबत विनंती केली. यानुषंगाने नागरिकांच्या रेशन कार्ड, बँक खाते, जनधन अकाउंट, मिठाई किंवा तत्सम दुकानातील अन्न भेसळीचे प्रकार, महावितरणची देयके इत्यादी विषयांबाबत ग्राहकांच्या छोट्या-मोठ्या समस्यांविषयी समिती सदस्यांनी साधक-बाधक चर्चा केली. तसेच ग्राहकांच्या अडचणी सोडविण्यासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनीही आवश्यक त्या उपाययोजना तात्काळ राबविण्याविषयी, कार्यवाही करण्याविषयी आश्वस्त केले. याशिवाय करोनाच्या संभाव्य तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर सर्व नागरिकांनी जिल्हा प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करून स्वतःचे, कुटुंबाचे आणि समाजाचे संरक्षण करणे गरजेचे असल्याचे मत सर्वांनी मांडले. त्या दृष्टीने प्रशासन आणि जिल्हा ग्राहक संरक्षण समितीचे सदस्य मिळून नागरिकांचे प्रबोधन करतील,असेही सर्वानुमते ठरले.